आध्यात्मिक उपाय : दृष्ट – खंड १

# मीठ-मोहरी, नारळ, तुरटी आदींनी दृष्ट कशी काढावी ?

## (दृष्टविषयीच्या शास्त्रीय विवेचनासह)

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते**

**श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ**

**सौ. प्रियांका सुयश गाडगीळ आणि अन्य**




**सनातन संस्था**


**सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !**

सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे ‘सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान’ असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १०.१.२०२४ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०४९ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !**

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## सनातनच्या सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांचे अद्वितीयत्व !



श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ



सौ. प्रियांका सुयश गाडगीळ

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते साधक पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयांवरील सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. वर्ष २००३ पासून त्यांना मिळणारे हे ज्ञान सनातनच्या साधारणपणे ६० हून अधिक ग्रंथांत घेतले आहे. ईश्वराकडून मिळणारे हे ज्ञान ग्रहण करण्यासाठी त्या साधकांना वाईट शक्तींच्या आक्रमणांनाही तोंड द्यावे लागते. असे असले, तरी गुरुकृपेच्या बळावर ते ही सेवा करतच आहेत.

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


१. ‘दृष्ट लागणे’ म्हणजे काय ? ९

२. दृष्ट लागण्याची सूक्ष्म स्तरावरील प्रक्रिया १०

३. दृष्ट लागण्याचे परिणाम किंवा दृष्ट लागली आहे, हे ओळखण्याची लक्षणे १२

४. ‘दृष्ट काढणे’ म्हणजे काय ? १३

५. दृष्ट काढल्याने होणारे लाभ १४

६. दृष्ट काढण्याच्या प्रक्रियेत भाव महत्त्वाचा १५

७. दृष्ट काढणार्‍या व्यक्तीवर दृष्ट निघण्याची फलनिष्पत्ती अवलंबून असणे १६

**८. दृष्ट काढण्याची पद्धत (केवळ कृती)** १८

**९. दृष्ट काढण्याच्या पद्धतीमागील शास्त्र आणि अनुभूती** २१

* दृष्ट काढून झाल्यानंतर जातांना दृष्ट काढणाऱ्याने मागे वळून का पाहू नये ? २२

**१०. दृष्ट काढण्यासाठी वापरले जाणारे घटक आणि त्यांद्वारे दृष्ट काढण्याच्या विविध पद्धती (मीठ, मोहरी, लाल मिरच्या, लिंबू, नारळ इत्यादी)** २५

* दृष्ट काढण्यासाठी मिठाचा वापर करण्याचे महत्त्व काय २६
* दृष्ट काढण्यासाठी लाल मिरच्या वापरण्याचे महत्त्व ३३
* दृष्ट काढण्यासाठी वापरावयाचे लिंबू ३७
* दृष्ट काढण्यासाठी वापरायच्या तुरटीचा आकार कसा असावा ? ४२
* तुरटीने दृष्ट काढतांना होणारी प्रक्रिया ४२
* नारळाने दृष्ट काढण्याचे महत्त्व ४५
* नारळाने दृष्ट काढण्यासंदर्भात आलेल्या अनुभूती ५९

**११. सतत साधना करणे, हाच दृष्ट न लागण्यावरचा खरा उपाय** ६४

卐 **काही आनुषंगिक सूत्रे** ६५

卐 **प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** ६९

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ७२

---

**टीप** ग्रंथातील काही सूत्रांच्या (मुद्यांच्या) शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.

# ‘दृष्ट’ या विषयाचे सामाईक मनोगत

बाळाला काजळाची तीट लावण्याचा संस्कार आजही जपला जातो. काही जुन्याजाणत्या स्त्रिया आलेल्या पाहुण्यावरून लिंबलोण आजही उतरवतात. परंपरा जेव्हा शतकानुशतके जपल्या जातात, तेव्हा त्यांमागे निश्चित काहीतरी शास्त्र असते, हे आपण समजून घ्यायला हवे.

सध्याच्या स्पर्धात्मक आणि भोगवादी युगात ईर्षा, द्वेषभाव, लोकेषणा, भिन्नलिंगी व्यक्तींकडे पहाण्याची वाईट दृष्टी यांसारख्या विकृतींनी बहुतांश व्यक्ती ग्रासलेल्या आहेत. या विकृतीजन्य रज-तमात्मक स्पंदनांचा त्रासदायक परिणाम सूक्ष्मातून नकळत दुसऱ्या व्यक्तींवर होतो. यालाच त्या व्यक्तींना ‘दृष्ट लागणे’ असे म्हणतात. तसेच कुटुंबात भांडणे, व्याधी, आर्थिक चणचण, वाईट स्वप्ने पडणे, नैराश्य, सिगारेट किंवा मद्य यांचे व्यसन यांसारख्या समस्या आता नित्याच्या झाल्या आहेत. जीवनातील ८० टक्के समस्यांमागील कारणे सकृद्दर्शनी स्थुलातील दिसत असली, तरी खरे मूळ कारण हे सूक्ष्मातील, म्हणजेच वाईट शक्तींचा त्रास, हे असते. वाईट शक्तींचा त्रास हाही दृष्ट लागण्याचाच प्रकार होय.

थोडक्यात, जीवन समस्यांरहित आणि आनंदी बनवायचे असेल, तर ‘दृष्ट काढणे’ हा सोपा घरगुती आध्यात्मिक उपाय अवलंबणे केव्हाही उपयुक्त ठरते. सध्याच्या विज्ञानयुगात वावरतांना ‘दृष्ट लागणे आणि दृष्ट काढणे’, हे शब्द उच्चारले, तरी बुद्धीजीवी लोक त्याला ‘पुरातन पद्धत’, असे हिणवून नाक मुरडतील. विज्ञानयुगात प्रत्येक गोष्ट शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडल्यास तिच्यावर लगेच विश्वास बसतो. त्यामुळे दृष्टविषयीच्या ३ खंडांत लागण्याची प्रक्रिया, विविध घटकांनी दृष्ट काढण्याच्या पद्धती, बाळाची दृष्ट काढण्याच्या सोप्या पद्धती, दृष्ट काढतांना घ्यावयाची काळजी इत्यादी विशद करतांना स्थूल माध्यमांतून न समजणाऱ्या गोष्टी ‘सूक्ष्म परीक्षणे’ आणि ‘सूक्ष्म ज्ञानाविषयीची चित्रे’ यांद्वारे स्पष्ट केल्या आहेत.

सनातनचे साधक समष्टी साधना करून ‘ईश्वरी राज्य’ स्थापन

करण्यासाठी प्रयत्न करत आहेत, तर वाईट शक्ती 'आसुरी राज्य' स्थापन करण्यासाठी प्रयत्नरत आहेत. त्यामुळे वाईट शक्ती साधकांना विविध प्रकारे मोठ्या प्रमाणावर त्रास देतात. दृष्ट काढण्यापूर्वी असलेली साधकांची स्थिती, दृष्ट काढल्याने त्यांच्यावर झालेला परिणाम आणि त्यांना झालेले लाभ हे सनातनच्या साधकांना आलेल्या अनुभूतींतून मांडले असल्याने दृष्ट काढण्याची पद्धत शास्त्रशुद्ध असल्याचे सप्रमाण सिद्धही झाले आहे.

दृष्ट काढण्याचे महत्त्व लक्षात घेऊन अधिकाधिक जणांनी दृष्ट काढून स्वतःभोवती निर्माण झालेले त्रासदायक स्पंदनांचे आवरण दूर करावे आणि साधनेने ब्रह्मांडातील ईश्वरी लहरींचा लाभ करून घ्यावा, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या 'सच्चिदानंद परब्रह्म' या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये 'प.पू.' आणि 'परात्पर गुरु' या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

## सनातनच्या दोन सद्‍गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्‍गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ' आणि सद्‍गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ' असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.